# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

विभागीय कार्यालय, कामगार कल्याण भवन, सहकारनगर क्र.१, पुणे -४११००९

दूरध्वनी क्र – ०२०- २९५२८७३३

ई मेल - mlwbpune@gmail.com


---

जा.क्र : विकापु/बांधकाम/२०२२-२३/२२९५ दि.२३/१२/२०२२

## जाहीर प्रकटन

कामगार कल्याण भवन, सहकारनगर, पुणे येथे १०० के.व्ही.ए. क्षमतेचे नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लि. कडील अधिकृत मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून दि.२ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अधिक माहितीसाठी मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा वरील नमूद पत्यावर संपर्क साधावा.

– स्वाक्षरी -

प्र.सहायक कल्याण आयुक्त

विभागीय कार्यालय, पुणे

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

विभागीय कार्यालय, कामगार कल्याण भवन, सहकारनगर, पुणे -४११००९

दूरध्वनी क्र – ०२०- २९५२८७३

ई मेल - mlwbpune@gmail.com


---

जा.क्र : विकापु/बांधकाम/२०२२-२३/२२९५ दि.२३/१२/२०२२

**जाहीर प्रकटन**

प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, कामगार कल्याण भवन, सहकारनगर, पुणे यांच्यावतीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, कामगार कल्याण भवन, सहकारनगर, पुणे येथे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लि. च्या अधिकृत मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून १०० के.व्ही नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. महावितरण कार्यालयाकडून या कामासाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक प्राप्त झाले असून ठेकेदारांनी खालील नमून्यात दरपत्रक सादर करावे.

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **अंदाजपत्रकीय दर (रुपयांत)** |
|---|---|---|
| अ) | नविन १०० के.व्ही.ए. ट्रान्सफार्मर व इतर आवश्यक मटेरियल खर्च | रु.२,८१,२९३/- |
| | मटेरियल ट्रान्सपोर्ट खर्च, इन्शुरन्स, कामगार व वित्त खर्च, सुपरविजन चार्जेस, उभारणी खर्च, आकस्मिता चार्जेस इत्यादी एकुण सेवा खर्च | रु.८५,७९४/- |
| | टर्नकी चार्जेस | रु.१८,३५४/- |
| | **एकुण** | **रु.३,८५,४४२/-** |
| ब) | ठेकेदाराने भरावयाचे दर ………………..% ABOVE /BELOW/AT PAR | **रु.** |
| | १८ टक्के जी.एस.टी | **रु.** |
| क) | **एकूण रक्कम** | **रु.** |
| | **अक्षरी रक्कम रुपये** | |

**नियम व अटी –**

१) वरील नमूद पत्यावर दि.२६/१२/२०२२ ते दि.०२/०१/२०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात सादर करावीत. प्राप्त दरपत्रके दि.०३/०१/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता उघडण्यात येतील.

२) दरपत्रकासोबत ठेकेदाराने महावितरण कार्यालयाकडील नोंदणीकृत/मान्यताप्राप्त प्रमाणपत्र, जीएसटी दाखला, पॅनकार्ड इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडावीत. सदर कागदपत्रे सादर न केलेली दरपत्रके बाद करण्यात येतील.

३) ट्रान्सफार्मर बसविण्याचा खर्च हा वाहतूक, मजुरी, जीएसटी इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन एकत्रित नमूद करावा. या व्यतिरिक्त इतर कोणताही अतिरिक्त खर्च मंडळाकडून ठेकेदारास दिला जाणार नाही.

४) महावितरण कार्यालयाकडे जमा करावयाचे सुपरविजन चार्जेस मंडळाद्वारे अदा करण्यात येतील.

५) ठेकेदाराने सादर केलेल्या अंकात व अक्षरी नमूद केलेल्या दरात तफावत आढळल्यास यापैकी कमी असलेले दर ग्राह्य धरण्यात येतील.

६) संबंधित शासकीय प्राधिकारणाकडून/ महावितरण कार्यालयाकडून आवश्यक मान्यता प्राप्त करुन घेण्याची अंतिम जबाबदारी ठेकेदाराची असेल.

७) महावितरण कार्यालयाने काम समाधानकारक असल्याचे प्रमाणित केल्यानंतरच ठेकेदारास देयक अदा केले जाईल.

८) वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय /महावितरण कार्यालयाचे निर्णय / परिपत्रके / मार्गदर्शक सूचना / अध्यादेश याच्या अधीन राहून काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल.

९) कामाचा दर्जा समाधानकारक न आढळल्यास कामाचा ठेका रद्द करण्याचा अधिकार मंडळास असेल.

१०) सदर कार्यवाही करतांना कोणताही वाद निर्माण झाल्यास सहायक कल्याण आयुक्तांनी घेतलेला निर्णय ठेकेदारांवर बंधनकारक असेल.

११) कोणतेही कारण न देता कोणतीही एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा / स्विकारण्याचा अधिकार हे कार्यालय राखून ठेवत आहे.

- स्वाक्षरी -

प्र.सहायक कल्याण आयुक्त

विभागीय कार्यालय, पुणे